दिनांक १४/०३/२०२३

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक राजेंद्र नेपाळबुवा गिरी, वय ५८ वर्षे, पद– प्राचार्य, वर्ग– १, नेमणुक– जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरूड, जि. लातूर, रा. सौभाग्य नगर, खाडगाव रोड, लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक राजेंद्र नेपाळबुवा गिरी, प्राचार्य यांनी तक्रारदार यांना व त्यांचा चार महिन्यांचा पगार काढण्यासाठी केलेल्या मदतीचा मोबदला म्हणुन व त्यांची पेन्शन ची फाईल नागपुर कार्यालयात पडताळणी करीता पासवर्ड देउन लवकरात लवकर पाठविण्या करीता लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य लोकसेवक राजेंद्र गिरी यांनी दारू व मटणाच्या पार्टीसाठी तक्रारदार यांना २५००/–रूपये लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. १४/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. १४/०३/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना व त्यांचे चार महिन्यांचा पगार काढण्यासाठी केलेल्या मदतीचा मोबदला म्हणुन व त्यांची पेन्शन ची फाईल नागपुर कार्यालयात पडताळणी करीता पासवर्ड देउन लवकरात लवकर पाठविण्या करीता लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे **प्राचार्य लोकसेवक राजेंद्र गिरी यांनी दारू व मटणाच्या पार्टीसाठी तक्रारदार यांना २५००/– रू लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.**

वरील प्रमाणे आज दि. १४/०३/२०२३ रोजी १८.१७ वा. सुमारास तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक राजेंद्र नेपाळबुवा गिरी, प्राचार्य यांनी २५००/– रू लाचेची मागणी करून लाचेची रक्कम घेण्याचे मान्य करून लाचेची रक्कम देण्यासाठी जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, लातूर येथे आलोसे राजेंद्र नेपाळबुवा गिरी, प्राचार्य यांच्या .कार्यालयात पंचासमक्ष लाचेची रक्कम २५००/–रू स्वत: स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक राजेंद्र नेपाळबुवा गिरी, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरूड, जि. लातूर यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर, लातूर, ता.जि. लातुर, येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयाचा तपास पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/रमाकांत चाटे, फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलूरे, शाम गिरी, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, मपोकॉ/रूपाली भोसले, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner